कृषि विभागाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माध्यम आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२५/प्र.क्र.८३/३-अे (ई-११२६३२४)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : २५ जुलै, २०२६

वाचा -

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-२०२१/प्र.क्र१२६/का-३४, दि.१३.०८.२०२१

२) आयुक्त (कृषि) यांचे पत्र जा.क्र.कृमावि/विप्र-४/माध्यम आराखडा/र-१९९/२०२६, दि.१५.०६.२०२६

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि.०७ जुलै, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना -

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १३.०८.२०२१ च्या शासन निर्णयानुसार शासकीय जाहिराती वितरण धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने २०२६-२७ या आर्थिक वर्षातील आषाढी वारीच्या कालावधीत कृषि विभागाच्या योजनांची विविध उपक्रमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी माध्यम आराखड्याचा प्रस्ताव माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार कृषि विभागाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीची बैठक दि.०७.०७.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर माध्यम आराखड्यास वित्तीय मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने २०२६-२७ या आर्थिक वर्षातील आषाढी वारीच्या कालावधीत कृषि विभागाच्या योजनांची विविध उपक्रमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी रु.१००.०० लक्ष इतक्या निधीच्या मर्यादेत माध्यम आराखड्यास करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर माध्यम आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. २०२६-२७ या आर्थिक वर्षातील आषाढी वारीच्या कालावधीत कृषि विभागाच्या योजनांची विविध उपक्रमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी रु.९९,९७,९००/- (अक्षरी रुपये नव्याण्णव लाख सत्त्याण्णव हजार नऊशे फक्त) इतक्या रकमेच्या माध्यम आराखड्यास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता

देण्यात येत आहे. या प्रचार व प्रसिध्दी माध्यम आराखड्यानुसार येणाऱ्या अंदाजित रकमेचा तपशिल सोबत जोडलेल्या **विवरणपत्र "अ"** नुसार राहील.

२. प्रस्तुत बाबींकरिता होणारा खर्च मागणी क्र. डी-०३, २४०१, (०१) (०३) पीक स्पर्धा (कार्यक्रम), २६, जाहिरात व प्रसिद्धी (२४०१ ०७५३) या लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ मधील मंजूर केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सन २०२६-२७ मध्ये प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विषयांकित देयके संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांच्या कार्यालयाकडे थेट सादर करण्यात यावीत.

४. प्रस्तुत प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/आदेश/परिपत्रके यानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-१०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७/०४/२०१५ अन्वये निर्गमित नियम पुस्तिका १९७८ मधील तरतूदींचे/अटी व शर्तींचे पालन करुन तसेच खरेदी प्रक्रियेबाबत विहीत तरतूदींचे व कार्यपध्दतीचे आणि काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०७२५१८०२२५९२४६ असा आहे.

हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विशाल टेके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति -

१. मा.मंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

७. अपर मुख्य सचिव (वित्त), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. सचिव (नियोजन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
१३. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१४. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१६. महालेखाकार(स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई
१७. महालेखापाल - १/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९. वित्त विभाग (कार्या.व्यय-१) (अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई-३२
२०. कार्यासन अधिकारी, ४-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (कार्यासन-३अे)

****

विवरणपत्र “अ”

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/३-अे, दिनांक : २५.०७.२०२६ चे सहपत्र

२०२६-२७ या आर्थिक वर्षातील आषाढी वारीच्या कालावधीत कृषि विभागाच्या योजनांची विविध उपक्रमांद्वारे व्यापक प्रसिध्दीकरिता माध्यम आराखड्याचा तपशील

अ.क्र.	माध्यम	मूळ दर, प्रक्रिया	तपशील	वारंवारिता	संख्या	एकूण अंदाजित रक्कम (₹)	जीएसटी (₹)	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) (₹)
१	**पालखी मार्गावर दालने उभारणी करून योजनांची प्रसिद्धी** (संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या मार्गावरील प्रत्येकी प्रमुख तीन मुक्कामाच्या ठिकाणी वारी दरम्यान विविध प्रभावी माध्यमे वापरून कृषि विभागाच्या महत्त्वाच्या योजनांची प्रसिद्धी करणे)	विहित निविदा / दरपत्रके प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सूचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रसिद्धी करणे शक्य होईल. (Pagoda Structure, Platform with Carpet with Department Branding, Table & Chair, Manpower, Travel, ३ Information Booth)	नमूद अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत	६	८१,९५,०००	१४,७५,१००	९६,७०,१००
२	**प्रदर्शनाद्वारे योजनांची प्रसिद्धी** पंढरपूरतच्या जवळपास पुरेशी जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी कृषि प्रदर्शनाचे आयोजन आकार-३०m X २०m (Tin Waterproof Shade, Flooring, Railing. Lighting tower, Stalls, PA system, Security, Lighting, Power, Manpower, Photobooth etc.))	विहित निविदा / दरपत्रके प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांपार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित आहे.	नमूद अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत	१			

अ.क्र.	माध्यम	मूळ दर, प्रक्रिया	तपशील	वारंवारिता	संख्या	एकूण अंदाजित रक्कम (₹)	जीएसटी (₹)	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) (₹)
३	**LED व्हॅनद्वारे योजनांची प्रसिद्धी** (As per ground requirement & Design + Running संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर प्रत्येकी १)	विहित ई-निविदा / दरपत्रके प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांपार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित आहे.	नमूद अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत	२ नग			
४	**प्रचार व प्रसिद्धी साहित्य डिझाईन व कमान उभारणी** प्रचार व प्रसिद्धी साहित्य डिझाईन व कमान उभारणी व इतर अनुषंगिक बाबीद्वारे योजनांची प्रसिद्धी (घडीपत्रिका, पोस्टर्स, होर्डिंग बॅनर व बॅकड्रॉप, कमान (Arch Gate)२ D Cutout उभारणी, इतर अनुषंगिक प्रचार व प्रसिद्धी साहित्य)	विहित ई-निविदा / दरपत्रके प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांपार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित आहे.	आवश्यकतेनुसार	-			
५	**कलापथक** (१२ Artist with Costume including their Food + Stay + Travel with Director, Portable PA System (०६-०८ Play per day)	विहित ई-निविदा / दरपत्रके प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांपार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित आहे.	आवश्यकतेनुसार	-			
	एकूण					८१,९५,०००	१४,७५,१००	९६,७०,१००

अ.क्र.	माध्यम	मूळ दर, प्रक्रिया	तपशील	वारंवारिता	संख्या	एकूण अंदाजित रक्कम (₹)	जीएसटी (₹)	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) (₹)
	शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रु.५ कोटी बजाजाता)) प्रमाणे	शासन निर्णयातील तरतुदीनुसार	माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च			३,२७,८००		३,२७,८००
	एकूण रक्कम					८५,२२,८००	१४,७५,१००	९९,९७,९००